RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार

# महात्मा गांधीचे आर्थिक विचार

प्रा. दुनघव ए.डी.
*राज्यशास्त्र विभागप्रमुख , शंकरराव पाटील महाविद्यालय भुम*

---

महात्मा गांधी यांचे विचार समजण्यासाठी भारतातील राजकीय व आर्थिक घटनाची पार्श्वभुमी लक्षात घेतली पाहिजे. तात्कालिन परिस्थितीमध्ये जहाल, मवाळ असा विचार प्रवाह अस्तित्वात होता त्या काळात पाहिले महायुध्द झाले त्या वेळेस ब्रिटीशांनी भारतास मदत मागीतली व महात्मा गांधी यांनी ती देण्यास तयारी दाखवली. त्यानंतर मांटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा पाहिल्यावर भारतीय नेत्याची भ्रमनिराशा झाली कारण त्यात भारतीयांनी अपेक्षीलेले स्वराज्या दिलेले नव्हते. ब्रिटीशांनी महत्वाची खाती आपल्या ताब्यात ठेवून कमी महत्वाची खाती भारतीयाकडे सोपविली होती. तसेच ब्रिटीशासाठी नोकरीमध्ये वरिष्ठ जागा, अधिक पगार, रेल्वेत राखीव डब्बे, न्यायदानाची वेगळी पध्दती यामुळे भारतीय लोकमत बिघडले होते. या सर्व घटनांचा महत्मा गांधी यांच्या विचारावर प्रभाव पडलेला होता.

राजकारणा प्रमाणेच गांधीजीचे अर्थ कारण मानवतावादावर उभारलेले आहे. राजकारणात त्यांनी जसे अध्यात्म आणले त्या प्रमाणे अर्थकारणात विकेंद्रीत व विश्वास मुलक अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला तसेच स्वावलंबनावर भर देऊन विकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर भर दिला.

**<u>विकेंद्रीकरण</u>**

गांधीजीचा विकेंद्रीकरण अर्थव्यस्थेवर भर होता. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शोषण थांबवण्यासाठी श्रमप्रधान, स्वावलंबी ग्रामव्यवस्था निर्माण करण्यासाठी विकेंद्रीकरणावर त्यांनी भर दिलेला आहे.

शोषण गुलामगिरी थांबवण्यासाठी व व्यक्तिगत कौशल्याना वाव मिळण्यासाठी विकेंद्रीकरणाची आवश्यकता आहे.

केंद्रीकरणामध्ये एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता जाते तसेच ती व्यक्ती त्यामुळे आर्थिक शोषण करते तसेच इतरांना गुलाम बनवते यासाठी विकेंद्रीकरण गरजेचे आहे.

**<u>सहकारी जीवन</u>**

गांधीजीने सहकारी यांचा अर्थ असा सांगितलेला आहे की, सहकारी शेती म्हणजेच जमीनीची मशागत नांगरणे करणे यासारख्या गोष्टी सहका-याने कराव्यात त्यामुळे काय होईल. तर मजुरी व भांडवल यामध्ये बचत होऊन देशाचा विकास होण्यास मदत होईल.

ग्रामोद्योगाच्या संदर्भात गांधीजीचा असाच विचार असलेला आपणास दिसुन येतो. ग्रामद्योगामध्ये जनता वस्तु आपल्या झोपडयात तयार करुन त्या विकल्या जातील व येणारा नफा हा वाटून घतला जाईल.

**<u>औद्योगिकरण</u>**

महात्मा गांधीचा साधी राहणी व उच्च विचारसरणी यावर भर होता. पाश्चात देशाप्रमाणे औद्यागिकीकरण त्यांना मान्य नव्हते. मोठया प्रमाणावर औद्योगिकीकरण सुरु झाल्यास स्पर्धाचे व बाजारपेठेचा प्रश्न र्निमण होतो. त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष खेडयाचे शोषण होत असे महत्मा गांधीचे मत होते.

भारतासारख्या देशात मोठया प्रमाणात मनुष्यबळ असताना, मोठया प्रमाणात यंत्राच्या सहायाने उत्पादन क रण्यास मुळातच त्यांचा विरोध होता. तसेच कारखानदारीमुळे भौतीक सुखाकडे मानव वाटचाल करतो व मानव आळशी बनण्यास मदतच होते. व्यक्तीचा भौतिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी श्रमप्रधान अर्थव्यवस्था उचित ठरेल असे महत्मागांधीना वाटत होते. श्रमप्रधान अर्थव्यवस्थेवर गांधीचा भर होता. त्यांचा यंत्राला विरोध नव्हता तर त्या यंत्रावर प्रेम करण्याच्या प्रवत्तीला त्यांचा विरोध होत. शिवणयंत्रासारख्या मानवाला सहाय्यभुत ठरणा-या यंत्रणाला त्यांचा विरोध नव्हता. त्यामुळे मानवाचे कौशल्य वाढतेचे असे ते म्हणतात. त्यामुळे मानवाने यंत्राचे गुलाम न होता ती व्यवस्थीत रित्या हाताळावीत.

महात्मा गांधी म्हणतात जेंव्हा एखादे कार्य करावयाचे असते पण त्यासाठी लागणारे मनुष्यबळ कमी पडते त्यावेळेस यांत्रीकरण उपयोगी पडते. परंतु त्या कामासाठी मानसाची आवश्यकता असते. त्यावेळी यांत्रीकरण उपयोगी पडत नाही. मानवी श्रमाने जी कामे करता येणार नाहीत यासाठी यांत्रीकरणाचा उपयोग करावा अशी यंत्रे सरकारी मालकीची राहतील आणि लोकांच्या हितासाठी वापरली जातील याची काळजी घेतली पाहिजे.

**<u>विश्वस्त कल्पना :-</u>**

विश्वस्त संकल्पना ही आर्थिक समता व अहिंसक स्वतंत्र्याची गुरुकिल्ली आहे. विश्वस्त या कल्पनेमुळे भांडवल व श्रम यातील संघर्ष नाहीसा होईल. समाजात एक शांतता पुर्ण क्रांती घडुन येईल व त्यामुळे कोणत्याही कटुता निर्माण होणार नाही.

महत्मागांधीना आर्थिक समता निर्माण करावयाची होती पण ती केवळ अहिंसक मार्गाने निर्माण करावयाची होती. महात्मा गांधीना लोकांना नैतिक व बौध्दीक दृष्टया स्वावलंबी बनवायचे होते. यासाठी त्यांनी नियोजीत राष्ट्रीय उत्पादन व खाजगी उद्योग धंदा यांचेवर भर देण्यात आला.

महात्मा गांधीना वर्ग संघंषाचा सिध्दांत मान्य नव्हता. भांडवलदार व कामगार तसेच जमीनदार व शेतमजुर यांनी एकमेकांना सहाय्य करावे असे त्यांचे मत होते. महात्मा गांधी म्हणतात की, धनिक वर्गाला अशी जाणीव झाली पाहिजे की, आपल्यामध्ये जो आत्मा आहे तोच लोकांमध्ये आहे. त्यामुळे त्यांनी स्वतःला विश्वस्त मानव मानावे. जो विश्वस्त बनतो तो मालक राहत नाही.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार

<u>संग्रह वृत्ती कमी करणे -</u>

गांधीजीने असे म्हटले आहे की, माणसाकडे असलेली संग्रह वृत्ती कमी केली पाहिजे माणसाला जीवन जगण्यासाठी ज्या वस्तूंची आवश्यकता हवी असते त्या वस्तूचा त्याने उपयोग करावा त्यासाठी जास्त राहणा-या वस्तूचा त्याग करावा. यासाठी त्यांनी देवाचे उदाहरण दिले आहे ते म्हणतात की, ईश्वर कोणत्याही वस्तूचा संग्रह करत नाही. तर त्यामुळे ते सर्व शक्तीमान असतात. त्यामुळे मानवाने आपल्या गरजा प्रमाणे मिळवावे आणि कशाचाही संग्रह करू नये.

महात्मा गांधी म्हणतात सर्वांना एकच वस्तू जवळ बाळगण्यासारखी आहे ती म्हणजे काही जवळ न बाळगणे म्हणजेच स्वेच्छेने त्याग करावा.

वरील सर्वांवरून असे लक्षात येते की, गांधीजींना अल्प संख्याक व बहुसंख्याक या सर्वांना विकासाची संधी मिळून सर्वांचे कल्याण व्हावे या दृष्टीने अर्थव्यवस्था निर्माण केली पाहिजे यावर त्यांनी भर दिला यावरून गांधीच्या <u>अर्थव्यस्थेची लक्षणे पुढील प्रमाणे-</u>

1) सहकारी शेतीवर भर देण्यात आला.
2) यांत्रिकिकरणाला गरजेपुरते महत्व दिले.
3) ग्रामद्योगाच्या विकासाला महत्व दिले.
4) मानवी जिवन पशु जिवन यामध्ये समतोल निर्माण केला.
5) विकेंद्रीकरणावर भर दिला

गांधीजीने स्वदेशी सर्वोदय विकेंद्रीकरण, विश्वस्त पणा यावर आधारीत आर्थिक विचार मांडुन सध्याच्या काळातील यंत्रसंकृती, वर्गकलह, व्यापारी, स्पर्धा यासारख्या गोष्टी टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे.

<u>संदर्भ ग्रंथ -</u>

1. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत -डॉ शांताराम भोगले
2. भारतीय राजकीय विचारवंत -डॉ. भा ल भोळे
3. अधुनिक राजकीय विचार प्रणाली- प्रा. सुमीत्रा काकडे
4. शिक्षण क्षेत्रातील विचारवंत- प्रा.ना.ग. पवार

S.P.Mahavidyalaya, Bhoom • Bhoom • Tq.Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad